



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील**
**लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०२ ● अंक : १६० ● पुणे ● बुधवार, दि. ०७ मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




# निवडणुकांचा मार्ग मोकळा; विलंब झाला, पण स्वागतार्ह...



Justice delayed is justice denied अशी इंग्रजीत एक म्हण आहे. मराठीत त्याचा अर्थ काढायचा झाला, तर न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारण्यासारखे असते. आज या म्हणीची पुन्हा आठवण झाली ती, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात दिलेल्या एका निर्णयामुळे. उशिरा का होईना; परंतु सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीखमध्ये न पडता निवडणुकांचा मार्ग मोकळा केला ते बरे झाले. त्याबदल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

सत्तेतून समाजकारण आणि समाजकारणातून विकासाची प्रगती व्हावी, यासाठी पंचायत राज कायदा करणाऱ्या भारत देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना जनतेचे प्रश्न मांडण्याची चांगली संधी मिळते. निधीचे वाटप गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होते. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. त्यातून लोकप्रतिनिधी निवडून येतात. महाराष्ट्रातील या निवडणुकांना गेले तीन ते साडेतीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका याचिकेमुळे खो बसला होता. त्यामुळे आयुक्त दर्जाचा सनदी अधिकारी प्रशासकाच्या भूमिकेतून महापालिकेचा कारभार सांभाळत होता.

लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिल्याने, गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले राजकीय पक्षाचे माजी नगरसेवक, इच्छुक पदाधिकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर, नागरी सुविधासंदर्भात स्थानिक पातळीवर कोणाकडे बाजू मांडायची या विवंचनेत असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आधार मिळणार आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर या निवडणुकांचे घोंगडं इतकी वर्ष प्रलंबित होते. मात्र, यंदाच्या



निवडणुका घेताना, सन २०२२ मध्ये सादर झालेल्या बांठिया कमिशनच्या अहवालानुसार आधी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसारच घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून दिल्याने, ओबीसी आरक्षणाला सध्या तरी धक्का बसणार नाही, हे अधोरेखित झाले. १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी परिस्थिती होती, तीच परिस्थिती कायम राहणार आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील याचिका पुढील सुनावणीसाठी ठेवली आहे. त्यावरील निकाल कधी लागेल हे आता सांगणे कठीण आहे. मात्र, यातून सुवर्णमध्य काढून सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला देण्याचा शहाणपणा याआधी ज्यांच्याकडे हे प्रकरण सुनावणीसाठी आले त्यांनी घेतला असता तर, बरं झालं असते.

बांठिया कमिशनच्या अहवालानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे निर्देश दिले होते. यासंदर्भात दाखल सर्व याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. ज्यात केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी प्रलंबित निवडणुका व्हायला हव्यात, अशी भूमिका मांडली, तर विरोधक याचिकाकर्त्यांकडून ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ इंदिरा जयसिंह यांच्याकडून निवडणुका या २०२० च्या बांठिया कमिशन रिपोर्टमधील शिफारशींनुसारच घ्याव्यात, असा युक्तिवाद करण्यात आला होता. "राज्यात पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. लोकप्रतिनिधींनी लोकल बॉडी चालवल्या पाहिजेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. पण त्या विपरीत हे सुरू आहे. औरंगाबाद आणि नवी मुंबईत पाच वर्षांपेक्षा अधिक काळ प्रशासकांचा आहे, ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली होती. लोकशाहीसाठी हे योग्य नसल्याचे ही कोर्टाच्या लक्षात आले. विशेष म्हणजे सुनावणी दरम्यान ओबीसी आरक्षणाशी संबंधित कुठल्याही याचिकेचा या निवडणुकांवर परिणाम होणार नाही. कारण यापुढे येणारे निकाल हे न्यायालयाच्या अंतिम निकालावर अवलंबून असतील. आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेणे हे योग्य नाही. भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणेही तितकेच गरजेचे आहे, अशी टिप्पणी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह १४ महापालिकेच्या निवडणुका येत्या सप्टेंबरपर्यंत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आपल्या देशात न्यायव्यवस्थेला आदराचे स्थान आहे. त्यामुळे न्यायालयाकडून आलेल्या निर्णयाकडे प्रशासन ही गांभीर्याने पाहतो. मात्र, गेल्या काही वर्षातील न्यायालयाकडून आलेले निर्णय, निकाल पाहता, ते व्यक्तीसाक्षेप असल्याचे दिसून आले आहेत. न्यायदानाच्या खुर्चीत जो बसतो, तो आपल्या आकलनशक्तीने कायद्याच्या भाषेत त्याचे प्रमाण ठरवून निर्णय देत असतो. त्यामुळे, अनेकदा असे म्हटले जाते की, न्यायालयाकडून मिळतो तो न्याय नव्हे, तर केवळ एक निर्णय असतो. भारताने लोकशाही प्रणाली स्वीकारली आहे. जनतेतून निवडून आलेले प्रतिनिधी राज्य कारभार सांभाळतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर 'मिनी राज्य कारभार' चालविणाऱ्या महापालिकासारख्या निवडणुका गेले तीन वर्षे झाल्या नाहीत, ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास येऊनही या आधीच्या खंडपीठाने त्याकडे तितकेसे गांभीर्याने का घेतले नाही, असा मनात प्रश्न उपस्थित झाला, तर ती चुक म्हणता येत नाही.

# अखेर दक्षिण पुण्यातील पाणीकपात मनपाकडून रद्द !

## आ. भीमराव तापकीर यांची शिष्टाई यशस्वी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मागील आठवड्यामध्ये पुणे महानगरपालिकेने दक्षिण पुण्यात आठवड्यातून एक दिवस पाणी कपातीचा निर्णय घेतला होता. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण झाले होते. ही

अन्यायकारक पाणीकपात रद्द करण्यासाठी खडकवासल्याचे आ. भीमराव तापकीर यांनी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांची भेट घेत चर्चा केली.

धरणामध्ये मुबलक पाणी असताना पाणी कपात नागरिकांना त्रास देणारा हा निर्णय तात्काळ माघारी यावा..व भागातील नागरिकांना दिलासा द्यावा. पाणीकपात तातडीने रद्द केली नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे आ .भीमराव तापकीर यांनी दिला .

यावर तातडीने निर्णय घेऊन सदरील पाणीकपात तातडीने रद्द करण्यात येणार असल्याचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी यावेळी सांगितले.

त्यानंतर पुणे महानगरपालिकेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही पाणी कपात रद्द करत असल्याचे जाहीर केले.

यापूर्वी नियोजनाप्रमाणे दक्षिण पुणे परिसरात आठवड्यातील एक दिवस पाणीकपात केली जात होती. पाण्याची उपलब्धता असतानाही केवळ वितरणातील त्रुटींमुळे हा प्रकार घडत होता.

त्यामुळे त्यावर तातडीने मार्ग काढून पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, यासंदर्भात आग्रही भूमिका आ.भीमराव तापकीर यांनी मांडली.

महापालिका आयुक्त श्री. राजेंद्र भोसले यांनी तातडीने पाणीकपात रद्द करण्याचा निर्णय घेतला. यावेळी आ .भीमराव तापकीर , माजी नगरसेवक वर्षा तापकीर, श्री. राजाभाऊ लायगुडे, श्री. हरिदास चरवड, अल्पनाताई वरपे, श्री. बाळासाहेब नवले, श्रीकांत जगताप, विधानसभा अध्यक्ष सचिन मोरे , गणेश वरपे पाटील, यशवंत लायगुडे,श्री. रुपेश घुले पाटील, यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या निर्णयानंतर परिसरातील नागरिकांनी आ. भीमराव तापकीर यांचे आभार मानले.

## ज्ञानदीप फाउंडेशनतर्फे कर्मचारी व अधिकारी यांचा सत्कार !



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून ज्ञानदीप फाउंडेशन व धायरी ग्रामस्थ यांच्यावतीने कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानदीप फाउंडेशनचे अध्यक्ष नामदेव भरूक यांच्या अध्यक्षतेखाली तसेच धायरीचे युवा नेते बापूसाहेब पोकळे यांच्या सौजन्याने हा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला.

एक मे रोजी महाराष्ट्र दिनी सकाळी आठ वाजता पद्मावती मंदिर धायरी गाव येथे हा कार्यक्रम घेण्यात आला.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विराज परदेशी व विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार मिळाल्याबद्दल दिगंबर पोकळे, आयएएस पदी निवड झाल्याबद्दल शिवांश जागडे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ नेते श्रीरंग चव्हाण, माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, गुलाबराव पोकळे ,गंगाधर भडावळे, तुषार पोकळे, ॲड .राजेश मिंढे, ॲड राजेंद्र भूरूक, रामदास कुंभार, दिलीप रायकर, मंगेश बनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी महाराष्ट्र दिनाच्या निमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व कर्मचारी व अधिकारी यांना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## मुख्यमंत्री यांची शशिकांत धोत्रे यांच्या चित्रप्रदर्शनास भेट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रसिद्ध चित्रकार श्री. शशिकांत धोत्रे यांच्या नवनिर्मित चित्रकृतींच्या प्रदर्शनास भेट दिली. या प्रदर्शनात त्यांनी धोत्रे यांच्या विविध कलाकृतींचे मनापासून कौतुक केले आणि त्यांच्या अप्रतिम चित्रशैलीला दाद दिली. चित्रकार शशिकांत धोत्रे यांच्या कलाप्रदर्शनास भेट देतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेथेच उपस्थित असलेल्या 'सजना' या आगामी मराठी चित्रपटाच्या टीमकडून चित्रपटाचा टिझरही पाहिला. टिझर पाहिल्यानंतर त्यांनी सिनेमाच्या संकल्पनेचे कौतुक करत संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या आणि उत्सुकता व्यक्त केली.'सजना' चित्रपटासाठी मा. फडणवीस यांनी मराठी सिनेसृष्टीला नवसंजीवनी देणाऱ्या अशा कलाकृती अधिकाधिक यशस्वी होवोत, असे मत व्यक्त केले.

शशिकांत धोत्रे यांचे चित्रकलेतील योगदान हे महाराष्ट्राच्या कलासंस्कृतीसाठी अत्यंत मौल्यवान आहेतच पण त्याचबरोबर सध्या त्यांच्या आगामी चित्रपटाची म्हणजेच 'सजना' ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहे.

## रेमेडियम लाईफकेअर राइट्स इश्यूला सकारात्मक प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
रेमिडियम लाइफकेअर लिमिटेडचा राइट्स इश्यू हा कंपनीच्या वाढीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या इश्यूला गुंतवणूकदार आणि भागधारकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे आणि दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस 26.03% सदस्यता प्राप्त झाली आहे. उल्लेखनीय म्हणजे, रेमिडियम लाइफकेअर ही फार्मास्युटिकल उद्योगासाठी पुरवठा श्रृंखला व्यवस्थापनाचा भाग म्हणून कच्च्या मालाचे व्यापार आणि वितरण करण्यात विशेष असलेली एक वेगाने वाढणारी कंपनी आहे.

या इश्युद्वारे उभारलेला निधी जागतिक विस्ताराच्या उपक्रमांना गती देण्यासाठी, प्रमुख आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये कंपनीचा ठसा मजबूत करण्यासाठी आणि कार्यरत भांडवल मजबूत करण्यासाठी आणि R&D क्षमतांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी धोरणात्मकरीत्या वापरला जाईल. यामुळे कंपनीचे एकूण आर्थिक आरोग्य सुधारेल.

REMEDIUM LIFECARE

त्याचा ताळेबंद मजबूत करून आणि ऑपरेशनल क्षमता वाढवून, रेमेडियल लाइफकेअरचे उद्दिष्ट त्याच्या गुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन महत्त्वपूर्ण मूल्य प्राप्त करणे आहे. याशिवाय, जागतिक विशेष रसायन आणि फार्मास्युटिकल क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याचेही तिचे उद्दिष्ट आहे.

रेमिडियम लाईफ केअर लिमिटेड चे पुर्णकलीन संचालक,आदर्श मुंजाळ रेमिडियम लाइफकेअर लिमिटेड म्हणाले, "या हालचालीमुळे कंपनीचे आर्थिक आरोग्य सुधारेल आणि लक्षणीय वाढीचा मार्गही मोकळा होईल. आमचे लक्ष जागतिक स्तरावर आमची उपस्थिती वाढवण्यावर आणि व्यापक बाजारपेठेत सेवा देण्यासाठी संशोधन आणि उत्पादन क्षेत्रात पुढे जाण्यावर आहे.

## नांदेड गाव व जेपी नगर येथे नवीन पाईपलाईन व रस्त्यांची दुरुस्ती करावी !

### रुपेश घुले पाटील यांची आयुक्त राजेंद्र भोसले यांच्याकडे मागणी



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
नव्याने समाविष्ट झालेल्या नांदेड गाव व जेपी नगर परिसरातील पाणीपुरवठ्यासाठी मोठी पाईपलाईन टाकण्यात यावी अशी मागणी खडकवासला भाजपा उपाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी पुणे मनपा आयुक्त राजेंद्र भोसले यांच्याकडे केली आहे.

आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राजेंद्र भोसले यांची भेट घेऊन विविध विषयांचे निवेदन दिले.

त्यावेळी रुपेश घुले पाटील यांनी ही मागणी केली आहे. या भागामध्ये लोकवस्ती चे प्रमाण वाढले असल्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. यासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या व्यासाची पाईपलाईन टाकण्यात यावी. शिवाय ह्या परिसरातील अंतर्गत रस्ते हे खूप दिवसापासून नादुरुस्त अवस्थेत आहेत.

या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी ही निवेदनामध्ये रुपेश घुले पाटील यांनी केली आहे. या मागण्याचा विचार करावा व टाका प्रश्न सोडवावा असे आवाहन यावेळी आ.भीमराव तापकीर यांनी आयुक्त राजेंद्र भोसले यांना केले. या मागणीवर लवकरात लवकर कार्यवाही करू असे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड,खडकवासला भाजपा अध्यक्ष सचिन मोरे, गणेश वरपे पाटील, यशवंत लायगुडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात



### लोणी काळभोर पोलिसांनी बुलेटचा आवाज काढणाऱ्यांवर केली कारवाई

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) :** थेऊर परिसरात काही टवाळखोर व्यक्ती मागील काही दिवसापासून बुलेट दुचाकीचे सायलेन्सर बदलून मोठ्याने आवाज काढून फटाके फोडत असल्याची माहिती लोणी काळभोर पोलीस स्टेशनला प्राप्त झाली होती त्या आधारे या टवाळखोर बुलेट स्वरांचा बंदोबस्त करण्यासाठी लोणी काळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी थेऊर चौकीतील प्रभारी अधिकारीपोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार यांना बुलेट स्वरांचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला . त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार यांनी पोलीस हवालदार चंद्रकांत माने , पोलीस शिपाई आडके ,पोलीस शिपाई ताम्हाणे , पोलीस शिपाई मयूर बोरावके यांना थेऊर परिसरातील कर्णकर्कश आवाज काढणाऱ्या दुचाकी गाड्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यास सांगितले .त्यानुसार चंद्रकांत माने व त्यांच्या पथकाने थेऊर परिसरात गस्त घालत असताना आवाज करणाऱ्या दुचाकीचा शोध घेतला .थेऊर फाटा ते थेऊर ग्रामपंचायत दरम्यानच्या काळात चार बुलेट स्वार हे कर्णकर्कश आवाज काढत असल्याचे आढळून आले .त्यामुळे या चार बुलेट स्वरांवर त्यांच्या बुलेट ताब्यात घेऊन सायलेन्सर चेक केले असता ते कंपनीचे नसल्याने त्यांच्यावर वाहतूक विभागाच्या महिला पोलीस हवालदार सोफिया इनामदार यांच्यामार्फत कायदेशीर कारवाई करून सहा हजार रुपयांचा वाहतूक दंड वसूल केला . या गाड्यांचे मॉडिफाइड सायलेन्सर काढून त्यांना कंपनीचे सायलेन्सर बसविण्यात आले. ही कारवाई पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०५ डॉ. राजकुमार शिंदे , सहाय्यक पोलीस आयुक्त हडपसर विभाग श्रीमती अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे , पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार ,हवालदार चंद्रकांत माने ,पोलीस शिपाई अडके , पोलीस शिपाई ताम्हाणे , पोलीस शिपाई मयूर बोरावके यांनी केली . या कारवाईमुळे लोणी काळभोर परिसरातील बुलेटचा आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांवरचा वचक बसविण्यास पोलीस प्रशासनाला यश आले आहे .भविष्यात अशाच प्रकारच्या अत्यंत प्रभावी कारवाई करणार असुन असे आवाज काढणारे बुलेट स्वार आढळल्यास या गाड्यांचे नंबर लोणी काळभोर पोलीस स्टेशनला कळवावे .कळविणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सांगितले.

### सोनालीकाने एप्रिल २०२५ मध्ये एकूण ११,९६२ ट्रॅक्टर केली विक्री



**पुणे (आरंभ पर्व) :** भारताच्या नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल २०२५ मध्ये ११,९६२ ट्रॅक्टर्सची विक्री नोंदवून आर्थिक वर्ष २०२६ ची दमदार सुरूवात केली आहे. शेतकरी प्रथम या आपल्या तत्त्वज्ञानाचा ब्रँडला सातत्याने लाभ मिळत आहे. प्रत्येक प्रदेशानुसारच्या शेतकऱ्यांच्या गरजांना अनुरूप अत्याधुनिक ट्रॅक्टर कस्टमाईज्ड करून देशभरातील शेतकऱ्यांसाठी शाश्वत आणि लाभदायक वाढ शक्य करणारे मूल्याधिष्ठित उपाय सादर करण्यात सोनालिका सातत्याने अग्रेसर राहिली आहे. सोनालिका ट्रॅक्टर्सने आपली बहुप्रतीक्षित 'सोनालिका तूफानी धमाका' अगोदरच सादर केली आहे. त्यातून अविश्वसनीय किंमतीत सोनालिका हेवी ड्युटी ट्रॅक्टर घरी आणण्याची उत्साहवर्धक संधी देशभरातील शेतकऱ्यांना मिळाली आहे. खरीप पिकांच्या उत्पादनात गतवर्षीच्या तुलनेत वाढ आणि रब्बी पेरणीचा बळकट अंदाज, त्याच प्रमाणे मान्सूनचा चांगला अंदाज यामुळे भारतातील शेतकरी समुदायात आशेचे वातावरण आहे. शेतीच्या समृद्धीला चालना देण्याच्या प्रत्येक संधीचा फायदा घेण्याच्या दृष्टीने सोनालिकाचे हेवी ड्युटी ट्रॅक्टर जाणीवपूर्वक शेतकऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. कंपनीला जगातील नंबर १ इंटिग्रेटेड ट्रॅक्टर मॅन्युफॅक्चरिंग फॅसिलिटी असलेल्या तिच्या कारखान्याच्या सामर्थ्याचा लाभ होतो. तेथून दर २ मिनिटांनी एक उच्च-गुणवत्तेचा ट्रॅक्टर बाहेर पडतो आणि भारतीय शेतकऱ्यांना कामगिरीवर आधारित उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतात. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, आमचे हेवी ड्यूटी ट्रॅक्टर धोरणात्मकदृष्ट्या विकसित केले गेले असून किमान खर्चात शेतकऱ्यांची कामगिरी उंचावण्यासाठी ते सज्ज आहेत.

## थोडक्यात



### ‘सोमेश्वर फाउंडेशन’ तर्फे 'पुणे आयडॉल’ स्पर्धा १९ मे रोजी सुरू

पुणे (आरंभ पर्व) : ‘सोमेश्वर फाउंडेशन’ आयोजित महाराष्ट्रातील हौशी गायक, कलाकरांची 'पुणे आयडॉल २०२५' स्पर्धा दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील १९ ते २४ मे २०२५ या दरम्यान, पंडित भिमसेन जोशी नाट्यगृह, औंध येथे होणार असल्याची माहिती सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी दिली. दिवंगत आमदार विनायक निम्हण यांनी सन २००३ साली सुरू केलेल्या या स्पर्धेचे यंदा २३ वे वर्ष आहे. स्पर्धेचे उदघाटन गायन क्षेत्रात राष्ट्रपती पदक विजेत्या, प्रसिद्ध गायिका सावनी रविंद्र यांच्या हस्ते सोमवार दि.१९ मे, सकाळी ९.३० वा. पंडित भीमसेन जोशी नाट्यगृह, औंध येथे होणार आहे. अंतीम फेरी २४ मे २०२५ रोजी, १२ ते ३ या वेळेत बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार आहे. स्पर्धेचे फॉर्म www.sunnynimhan.com या संकेस्थळावर उपलब्ध असणार आहेत. प्रवेशाची अंतीम तारीख १५ मे २०२५ राहिल. अधिक माहितीसाठी संपर्क : सोमेश्वर फाउंडेशन कार्यालय, शिवाजीनगर गावठाण, जंगली महाराज रोड, पुणे. स्पर्धेचे परिक्षक म्हणून रामेश्वरी वैशंपायन, कल्याणी देशपांडे, जितेंद्र भुरूक, कोमल लाळगे हे काम पहाणार आहेत. वय वर्षे १५ पर्यंत 'लिटिल चॅम्प्स', वय '१५ ते ३० वर्ष ‘युवा आयडॉल‘, ३० ते ५० वर्ष ‘जनरल आयडॉल 'वर्ष ५० नंतर ‘ओल्ड इज गोल्ड' अशा चार गटात स्पर्धा होणार आहेत. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या पाच हौशी कलाकारांना विशेष निमंत्रित करून त्यांना गाण्याची संधी देऊन त्यांना सोमेश्वर फाउंडेशन तर्फे सन्मानित केले जाणार आहे. प्रत्येक गटातील विजेत्यास रोख रक्कम १५ हजार, १० हजार व मानाचे ‘पुणे आयडॉल’ सन्मान चिन्ह दिले जाणार आहे. सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने काही निवडक व प्रतिभावंत कलाकारांना शैक्षणिक व वैद्यकीय गरजेपोटी मदत म्हणून रोख रक्कम दिली जाते. प्रसिद्ध गायक अरूण दाते, प्रभा अत्रे, रविंद्र साठे, महेश काळे, त्यागराज खाडिलकर, डॉ. सलील कुलकर्णी, शौनक अभिषेकी, राहुल देशपांडे, वैशाली सामंत, अभिजित सावंत, अभिजित कोसंबी अशा गायन क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी या स्पर्धेच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना मार्गदर्शन केले आहे. सौरभ साळुंके, कोमल कृष्ण, तुषार रिठे, प्रमोद डाडर, विनोद सुर्वे, महंमद रफी अशा अनेक प्रतिभावंत कलाकारांनी गायन क्षेत्रात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. अशी माहिती जितेंद्र भुरूक आणि बिपीन मोदी यांनी दिली. स्पर्धेसाठी अमित मुरकूटे, अनिकेत कपोते, गणेश शेलार, संजय तारडे, प्रमोद कांबळे आदी नियोजन करत आहेत.

### श्री शंकर महाराज यांचा जीवनपट आता रूपेरी पडद्यावर झळकणार




पुणे (आरंभ पर्व) : श्री शंकर महाराज हे आधुनिक काळाचे सत्पुरुष म्हणून आज सर्वत्र परिचित आहेत. त्यांची समाधी ही सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. श्री शंकर महाराज हे योगीराज होते. ते स्वत: नेहमी म्हणत- सिद्धीच्या मागे लागू नका... त्यांना स्वत:ला सिद्धी प्राप्त होत्या पण त्यांनी कधीच उपाधी लावल्या नाहीत. "अवलिया" श्री शंकर महाराज या आगामी चित्रपटातून त्यांचा जीवनपट आपल्या भेटीस येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा शंकर महाराज समाधी सोहळ्याच्या दिवसाचे औचित्य साधुन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते चित्रपटाचे टीजर पोस्टर लॉन्च करण्यात आले. जयशंकर प्रॉडक्शन या निर्मितिसंस्थे अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून भाजपाचे मा.राजेंद्र (आबा) शिळीमकर हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाचे लेखन दिग्दर्शन शशि चंद्रकांत खंदारे यांचे असून याआधी त्यांनी अनेक महोत्सवात गौरवलेल्या "जिप्सी" या चित्रपटाचे लेखन दिग्दर्शन केले आहे. 'अवलिया' हा चित्रपट श्री सद्गुरू शंकर महाराज यांच्यावर असणार आहे. १८०० च्या सुमारास श्री सद्गुरू शंकर महाराज प्रकट झाले ते १९४७ मध्ये त्यांनी समाधी घेतली. या १५० वर्षाच्या कालखंडात त्यांनी असंख्य लीला केल्या, अगणित भक्तांना सन्मार्ग दाखवले, त्यांचा उद्धार केला.







# "बाजीराव पेशवे जयंतीनिमित्त, "छत्रपतींचे निष्ठावंत सेवक बाजीराव पेशवे" हे पुण्यातील एकमेव जाहीर व्याख्यान उत्साहात संपन्न"

## शिव वंदना मित्रपरिवार व वेंकटसाई होंडा यांच्या वतीने आयोजित उपक्रम

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी, सिंहगड रस्ता पुणे येथे शिववंदना मित्रपरिवार धायरी तर्फे, बाजीराव पेशवे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या "छत्रपतींचे निष्ठावंत सेवक बाजीराव पेशवे" या विषयावरील जाहीर व्याख्यान उत्साहात व तुडुंब गर्दीत संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त पोलीस अधिकारी मा.भानुप्रताप बर्गे साहेब व प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते सौरभ जी कर्डे उपस्थित होते. यावेळी बोलताना बर्गे साहेब म्हटले "आपण सर्वजण प्रथमतः भारतीय आहोत, आणि देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा आपल्याला मराठा इतिहासातून मिळते". यावेळी सौरभ कर्डे म्हटले "बाजीराव पेशवे यांची छत्रपतींवरील असीम निष्ठा वेळोवेळी प्रकट झालेली आहे. त्यांचे युद्धकौशल्य, व डावपेच शत्रूंना कधीच कळून यायचे नाही. मराठा साम्राज्याच्या अनेक शत्रूंना त्यांनी पराजित करून स्वराज्य वाढवले." यावेळी बोलताना आयोजक प्राज भिलारे म्हटले, "बाजीराव पेशवे यांचे जीवन अत्यंत प्रेरणादायी असून, त्यांच्यावरील जाहीर व्याख्याने पुण्यात होत नाहीत ही खंत मनात होती, म्हणूनच पुण्यातील एकमेव जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले". जातीवादामध्ये न अडकता तरुणांनी महापुरुषांचा आदर्श ठेवून देशासाठी मार्गक्रमण केले पाहिजे असे ही ते यावेळी म्हणाले.

तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व्याख्यानास लाभला. कार्यक्रमाची समाप्ती लहान मुलींनी म्हटलेल्या शिववंदनेने करण्यात आली.

### सामाजिक जनजागृतीसाठी व्यंकटसाई होंडा अग्रेसर

**धायरी व परिसरातील समाज प्रबोधन कार्यक्रमांमध्ये गेली अनेक वर्षापासून व्यंकटसाई होंडा सौजन्याची भूमिका पाडत आहे. वेंकटसाई होंडाचे श्री संतोष कदम हे गेल्या अकरा वर्षापासून या भागामध्ये चांगली सेवा देत आहेत. याशिवाय समाज प्रबोधन कार्यक्रमांमध्ये ते सातत्याने आग्रही दिसून येतात. त्यांचेही या निमित्त कौतुक नागरिकांनी केले.**

## एअरटेल बिझनेसने 'बिझनेस नेम डिस्प्ले' (बीएनडी) केले लाँच

**गुरुग्राम (दै. आरंभ पर्व)**

एअरटेल बिझनेसने आज उद्योगांसाठी ग्राहकांनी गुंतण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी डिझाइन केलेले उद्योग-प्रथम समाधान, म्हणजेच 'बिझनेस नेम डिस्प्ले' (बीएनडी) लाँच करण्याचे जाहीर केले आहे. ही सेवा व्यवसायांना आउटगोइंग कॉल केला असताना प्राप्तकर्त्याच्या मोबाइल स्क्रीनवर त्यांचे ब्रँड नाव दर्शवू देते, ज्यामुळे विश्वास जोपासला जातो आणि ग्राहकांना योग्य व्यवसाय कॉल्स आणि स्पॅम यांच्यात फरक करण्यास मदत मिळते.

एअरटेलने आपल्या ग्राहकांसाठी भारतातील पहिले स्पॅमसही लढणारे नेटवर्क सुरू करून स्पॅमचे आव्हान सोडवलेले आहे आणि त्यासाठी वापरकर्त्यांना शिकविण्याकरिता देशव्यापी जागरूकता मोहिमेद्वारे समर्थन पुरविले गेलेले आहे. या उपक्रमांमुळे ग्राहक जास्त प्रमाणात जागरूक राहू लागलेले आहेत आणि त्यामुळे स्पॅम चिन्हांकित केलेल्या किंवा माहीत नसलेल्या क्रमांकावरून आलेल्या कॉल्सकडे अधिक लोकं लक्ष देत नाहीत. याचा अनपेक्षित परिणाम सुद्धा झालेला आहे, कारण ब्रँड्सकडून केल्या गेलेल्या कॉल्सना सुद्धा स्पॅम म्हणून चिन्हांकित केले जात आहे. परिणाम स्वरूप बँका, अन्न पोहचविणारे, कुरिअर पोहचविणारे, डॉक्टरांच्या महत्वपूर्ण अपॉइंटमेंटसाठी हॉस्पिटल इत्यादींकडून येणारे महत्वपूर्ण कॉल्स ग्राहक उचलेनासे झाले नव्हते. "बिझनेस नेम डिस्प्ले" ने हे आव्हान सोडविले आहे आणि अंतिम ग्राहकांना सर्व इनकमिंग कॉल्सच्या बाबतीत माहितीपूर्ण निर्णय घेऊ दिल्याने संबंधित परंतु सुरक्षित संवाद साधण्याचे वातावरण सुलभ झालेले आहे.




## खेड तालुक्यातील बारावीचा निकाल ९३.९७ टक्के

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

बारावी परीक्षेचा खेड तालुक्याचा निकाल ९३.९७ टक्के इतका लागला. तालुक्यातील केवळ पाच महाविद्यालयांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. तर यंदाही मुलींनीच निकालात आघाडी घेतली आहे.महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ (बारावी) परीक्षेस खेड तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचे ४ हजार ८३१ विद्यार्थी बसले होते, यापैकी ४ हजार ५४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. खेड तालुक्यातील शाळांचा शेकडा निकाल पुढीलप्रमाणे : महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज (राजगुरुनगर) १०० टक्के, नवचैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय (काळूस) ९१.०७ टक्के. श्री भामचंद्र विद्यालय (भांबोली) ९६.६६ टक्के, उच्च माध्यमिक विद्यालय (वाशेरे) ९३. १० टक्के, नवमेश विद्यालय (चाकण) ४५.४५ टक्के, श्री समर्थ माध्यमिक विद्यालय (चिंबळी) ९८. ८९ टक्के, बी एम. पवार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (बिरदवडी) ८५. ७१ टक्के, आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज (डेहणे) ७६.६६ टक्के, आर्ट्स कॉमर्स कॉलेज (राजगुरुनगर) ९०.९० टक्के. श्री समर्थ ज्युनिअर कॉलेज (नाणेकरवाडी)-९९. ५९ टक्के, ज्ञानवर्धिनी ज्युनिअर कॉलेज (खेड) ९२. ८५ टक्के.

# जनतेसाठी धावणारा जनसेवक : सचिनभाऊ दोडके

## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

**(दै. आरंभ पर्व)**

**खडकवासला मतदारसंघातील प्रश्न असो वारजे माळवाडीचा! तो प्रश्न सोडवण्यासाठी जिद्दीने काम करणारा नेता म्हणजे सचिन शिवाजीराव दोडके!**

गेले वीस वर्षापासून सामाजिक असो व राजकीय क्षेत्रामध्ये दोडके बंधूंना जनतेचे लाभलेले वलय पाहता भविष्यातील मोठा नेता ह्यातून दिसून येतो.

आज 7मे त्यांचा वाढदिवस. वाढदिवसाच्या निमित्त आरंभपर्वने प्रसिद्ध केलेला हा लेखाजोखा!

एक शेतकरी कष्टकरी कुटुंबातील मुलगा ते विधानसभेमध्ये जबरदस्त फाईट देणारा "जनतेच्या मनातील आमदार" असा प्रवास नक्कीच कौतुकास पात्र आहे. काम म्हणजे सचिन दोडके ही ओळख गेली अनेक वर्षापासून वारजे भागामध्ये रुजू झाली आहे.

ह्या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सचिन दोडके यांनी अविरत प्रयत्न केले त्याची आता प्रचिती होत आहे..

जीवनात सहसा काही मिळत नाही त्यासाठी संधी निर्माण कराव्या लागतात.जनतेसाठी 24 तास जनसंपर्कात असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. सचिनभाऊ म्हणून हक्काने नागरिक येतात व समस्या सोडवून घेतात. वारजे माळवाडीचा नियोजनबद्ध विकास पाहता इतरांनाही एक आदर्श या निमित्त घालून दिला जातो. खरचं लोकप्रतिनिधीनी काय कामे करायला पाहिजे हे सचिन दोडके यांच्या प्रत्येक कामातून पाहायला मिळते.

आईच्या ममतेने व स्नेही यांच्या आशीर्वादाच्या जोरावर सचिन दोडके यांनी सामाजिक कार्यास प्रारंभ केला..

छोटे मोठे प्रश्न सोडवत वारजे माळेवाडी च्या विकासासाठी विकासाचा दोडके पॅटर्न अवलंबला.

कोणत्याही क्षेत्रात सुरुवातीला संघर्ष हा ठरलेलाच असतो. अगदी त्याचप्रमाणे पहिल्या निवडणुकीमध्ये अपयश येऊनही जनतेसाठी अविरत काम केले.

पुढे जनतेने तीन टर्म त्यांना "हॅट्रिक नगरसेवक" पदाची संधी दिली. वारजे माळेवाडीचे सर्विस रस्ते असो वा इतर कोणतीही कामे यामध्ये त्यांनी स्वतःजातीने लक्ष घालून प्रत्येक कामाचा दर्जा टिकवून ठेवला आहे..

त्यांची काम करण्याची जिद्द पाहून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने खडकवासला विधानसभा मतदारसंघाची 2019 साली उमेदवारी त्यांना देण्यात आली.

केवळ बारा दिवसांमध्ये तब्बल 63 हजाराचे मताधिक्य कमी करत अवघ्या 2000 मतांनी त्यांचा पराभव झाला..

नवखा उमेदवार असतानाही त्यांनी घेतलेली मते ही त्यांच्या नेतृत्वाची संपूर्ण महाराष्ट्रात दाखवून दिली..

मुंबई बेंगलोर हायवे वरील वडगाव ब्रिज व वारजे ब्रीजवरील ट्रॅफिक साठी तब्येत कमी करण्यासाठी नवीन सर्विस रस्ते व पुल यासाठी खा . सुप्रियाताई सुळे यांच्या मार्फत रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी सातत्याने पाठपुरावा केला.

हे काम प्रगतीपथावर आहे. वारजे माळेवाडीच्या पाण्याची समस्या नवीन जल कुंभ बांधण्यात आले व त्यातून पाणीपुरवठा सुरू केला.

खडकवासला मतदारसंघातील कोणताही प्रश्न असो त्यासाठी सचिन दोडके यांनी नेहमी आग्रही भूमिका घेतली आहे.



## विविध सामजिक उपक्रम, क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान



**: शब्दांकन :**
**लक्ष्मण साबळे - निवासी संपादक**

**(दै. आरंभ पर्व)**

सचिन दोडके यांनी समाजकारण व राजकारण करत असताना क्रीडा क्षेत्र असो वा सांस्कृतिक क्षेत्र यामध्येही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे.

क्रिकेटप्रेमी साठी सचिन दोडके करंडक, तसेच सर्व मैदानी खेळ व इतर खेळासाठी वारजे ऑलम्पिक गेली अनेक वर्षापासून सुरू आहे.

यामध्ये अनेक खेळाडूंना याचा चांगला फायदा झाला आहे. आणि खेळाडू राज्यस्तरीय देशांतर्गत स्पर्धेमध्ये ही सहभागी झाले आहेत.

वारजे माळवाडी परिसरातील नागरिकांसाठी वारजे सांस्कृतिक महोत्सव सुरू करण्यात आला आहे. यासही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.

दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त परिसरातील नागरिकांना मोफत दूध पुरवठा करण्यात येतो.

याशिवाय लहान मुलांसाठी मोफत पतंग व आंबा खाण्याची स्पर्धा, बाल मेळावा यासारखे विविध कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

हे सर्व कार्यक्रम आयोजित करत असताना यातील सातत्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सर्वात मोठा उंच ध्वजारोहण ही वारजे माळवाडी मध्ये करण्यात येते. ह्याचा मान नागरिकांना देण्यात येतो..

जनतेविषयी सामाजिक बांधिलकी जपणारा हा नेता सातत्याने खडकवासला मतदारसंघांमध्ये अविरत प्रयत्न करत आहे.

निवडणुका असो वा नसो जनतेसाठी धावणारा जनसेवक ही खरी ओळख सचिन दोडके यांची आहे..

जीवनात सगळेच दिवस आपले सारखे नसतात त्यातूनही मार्ग काढत जनहितार्थ प्रयत्न करणे सचिन दोडके यांनी सोडले नाही..

त्यामुळे खडकवासला मतदारसंघातील जनतेला त्यांच्याकडून आगामी काळात ही खूप काही अपेक्षा आहेत हे मात्र त्रिकाल सत्य आहे..



## थोडक्यात



### वाचनसंस्कृतीमुळे जगण्याला सौंदर्यदृष्टी येते - ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : वाचनातून आयुष्याला सामोरे जाण्याचे धैर्य व जगण्याची सौंदर्यदृष्टी मिळते. त्यामुळे सर्वच शाखांमधील विद्यार्थ्यांनी चौरस वाचनाची आवड जोपासावी. असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचकवीर पुरस्कार प्रदान कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ संजय शिंदे, प्रा. व्ही.बी.दौंडकर उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ चा वाचकवीर पुरस्कार द्वितीय वर्ष कला शाखेची विद्यार्थिनी दिव्या पिंगळे हिस देण्यात आला. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व सुमारे साडेतीन हजार रुपयांची पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष असून शैक्षणिक वर्षात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला वाचकवीर पुरस्कार देऊन प्रोत्साहित करण्यात येते. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांनी अधिकाधिक अवांतर पुस्तके वाचावीत या उद्देशाने वाचकवीर पुरस्कार देण्यात येतो. या प्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की आपल्याला काळाच्या आणि आपल्या लहानशा व्यक्तिगत आयुष्याच्या मर्यादा वाचनामुळे ओलांडता येतात. वाचन हा विद्यार्थ्यांसाठी स्वेच्छेने स्वीकारलेला आनंदाचा सोहळा व्हायला हवा. दिव्या पिंगळे हिचे अभिनंदन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहन देणाऱ्या मराठी विभागाचे कौतुक केले. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

### सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के




पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत बावधन येथील सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सातत्याने घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम , प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहायक उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांनी विद्यार्थी, पालकांचे, तसेच समूह प्राचार्य किरण राव, प्राचार्य वंदना पांडे, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत पवनी शार्दूल भिडे (९२.५० टक्के), संयुक्ता अशोक मोरे (९२.३३ टक्के), चिन्मयी ज्ञानेश रहाणे (९२ टक्के), शौनक विजय तिकोटेकर व आर्या सुनील बोर्डे (९१.८३ टक्के), शर्वरी योगेश महाबळेश्वरकर, रेवा सुनील करंदीकर व निषाद नैनीश लुब्री (९१.६७ टक्के) यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व पाचवा क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत विनीत महेश बंग (९१ टक्के), प्रसाद काशवी (९० टक्के), श्रीम गिरीश पसाद (८५.१७ टक्के), मीनाक्षी राहुल मालेगावकर (८०.३३ टक्के), तर श्रीनिवास पांडुरंग दगडे (७९.६७ टक्के) यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व पाचवा क्रमांक पटकावला. कला शाखेत झलक दर्शन गांधीने (९०.५० टक्के) पहिला, शुभश्री विश्वनाथने (८९.८३ टक्के) द्वितीय, शर्वरी मंदार दामलेने (८७.१७ टक्के) तृतीय, जान्हवी अजयकुमार (८६.६३ टक्के) हिने चौथे, तर निखिल संतोष खळदकर (८५.५० टक्के) याने पाचवे स्थान पटकविले.

### सूर्यदत्त पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत १०० टक्के उत्तीर्ण होण्याची परंपरा बावधन येथील सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचालित सूर्यदत्त पब्लिक स्कुलने कायम राखली आहे. बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सातत्याने घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. उल्लेखनीय कामगिरीबद्दल सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहायक उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांनी विद्यार्थी, पालकांचे, तसेच समूह प्राचार्य किरण राव, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व सुवर्णपदक देऊन गौरविण्यात येणार आहे. सूर्यदत्त पब्लिक स्कुलमध्ये विज्ञान शाखेत हर्ष रुपेश भुरे (९४.३३ टक्के) याने प्रथम, रेहान शकील सय्यद (९१.८३ टक्के) याने द्वितीय, श्रुतिका संतोष निगडे (९१.५० टक्के) हिने तृतीय, सिद्धांत सचिन आडमुठे (९०.१७ टक्के) याने चौथा, तर अदिब सर्फराज मुल्ला व अन्विता आदित्य जोशी यांनी प्रत्येकी ८९.५० टक्के गुण मिळवत पाचवे स्थान पटकावले. वाणिज्य शाखेत अनुष्का अजय कुमारने (८९.६७ टक्के) प्रथम, तनिषा अमर जोशीने (८९ टक्के) द्वितीय, सुहानी दीपक चुगने (८८.५० टक्के), आर्या अमोल लाडने (८७.५० टक्के) चतुर्थ, तर अदविता प्रसाद मेननने पाचवा क्रमांक पटकावला. कला शाखेत शरण्या चक्रवर्तीने (८८.८३ टक्के) प्रथम, फिओना तेजस बखईने (८७.५० टक्के) द्वितीय, सावनी उदयन भोरकरने (८७.१७ टक्के) तृतीय, राधा निलेश कद्दू (८६.६७ टक्के) चतुर्थ, तर अद्वैत ऋषिकेश उत्पातने (८५.५० टक्के) पाचवा क्रमांक पटकावला.

# खासदारांनी फिरवली पूर्व हवेलीकडे पाठ

**सचिन सुंबे**



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी निवडून आल्यापासून पूर्व हवेलीकडे पाठ फिरवली असुन पूर्व हवेलीतील अनेक प्रश्न मार्गी लागले नाहीत . पूर्व हवेलीला सध्या सर्वात जास्त महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वाहतूक कोंडीचा असून तो सोडविण्यासाठी खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी प्रयत्न करावेत असे नागरिकांचे म्हणणे आहे .वाहतूक कोंडीचा प्रश्न हा पुणे - सोलापूर महामार्गावरील असुन अवजड वाहनांना पुणे शहरात बंदी घातली असुन त्यामुळे ग्रामीण जनतेला यामुळे मात्र वेढीस धरले जात आहे .त्या वाहतूक कोंडीत रोजच अनेक रुग्ण वाहिका अडकत असुन त्यामुळे रुग्णांना मात्र याचा त्रास होत आहे . वाहतूक कोंडीत वाहनांना थोडेसे अंतर पार करण्यासाठी तासंतास जात असुन त्यामध्ये नागरिकांचे व विशेषतः लहान मुलांचे खुपच हाल होताना दिसत आहे .खासदार अमोल कोल्हे यांनी याबाबत वरिष्ठ पातळीवर बैठक घेऊन तो प्रश्न ताबडतोब सोडवावा अशी पुर्व हवेलीतील नागरिकांची अपेक्षा आहे .कारण वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अनेक पर्यायी मार्ग आहेत . फक्त गरज आहे ती वरिष्ठ पातळीवर सोडवण्याची व त्यासाठी लागणाऱ्या थोडयाशा निधीची .उन्हाळा आता कधी नव्हे एवढा कडक झाला असुन पाण्याची समस्या पुर्व हवेलीत दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

नवीन कँनल चालू आहे तोपर्यंत थोडी मदत होणार आहे परंतु तो बंद झाला की पुर्व हवेलीत गंभीर दुष्काळी परिस्थिती उभी राहणार आहे .पुर्व हवेलीतील अनेक गावांमध्ये केंद्राची जलजीवन योजना चालू आहे .यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे पूर्व हवेलीतील नागरिकांचे म्हणणे आहे. कोरेगावमुळ व उरुळी कांचन येथे तर करोडो रुपयांचा मुरुम व मातीच चोरीला गेली आहे .खासदार अमोल कोल्हे यांनी जर यात लक्ष दिले तर ही योजना लवकरात लवकर सुरू होईल .असे नागरिकांचे म्हणणे आहे .पुर्व हवेलीतील अनेक गावात पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून रस्त्यांची कामे चालू आहेत . या रस्त्याच्या दर्जा संदर्भात अनेक तक्रारी नागरिकांच्या आहेत .सोरतापवाडी येथुन तरडे गावात जाणाऱ्या रस्त्यावर तर ठेकेदाराने चक्क मातीचा उपयोग केला होता .त्यामध्ये ठेकेदाराला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते .मुदत संपुन सुद्धा काही ठिकाणी कामे अजुन पुर्ण झाली नसल्याचे नागरिकांनी सांगितले .खासदार अमोल कोल्हे यांनी या योजनेचे भुमीपुजन केले असुन नागरिकांनी रस्त्याच्या दर्जा बाबत दक्ष रहावे असे माजी आमदार अशोक पवार यांनी सांगितले होते .परंतु ठेकेदार नागरिकांना वाटाण्याच्या अक्षदा दाखवित असुन खासदार कोल्हे यांनी स्वतः या योजनेकडे पहावे व अनेक ठिकाणी चाललेल्या रस्त्यांच्या कामाचा आढावा घेणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी दिले . पुणे - सोलापूर महामार्गा हडपसर ते उरुळी कांचन पर्यंत ओबडधोबड झाला असुन दुचाकी व चारचाकी गाडी चालवताना व्हायबल होत आहे .तो रस्ता खासदार डॉ .अमोल कोल्हे यांनी पाहणी करून एक लेयर टाकण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे पुर्व हवेलीतील अनेक नागरिकांना सांगितले .

नुकताच जुन्नर तालुक्यात २३ गावात गारांचा पाऊस झाला त्यात शेतकऱ्यांचे नुकसान झाले. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी या भागांची पाहणी करुन पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई साठी विशेष पँकेज देण्याचा प्रस्ताव राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाला सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले .मग

गुरुवारी ( दिनांक १० एप्रिल ) दुपारी साडेचार वाजता झालेल्या गारांच्या पावसामुळे लोणी काळभोर व परिसरात शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले . त्याकडे खासदार अमोल कोल्हे यांनी पाठ फिरवली . मग जुन्नरचा शेतकरी व हवेलीचा शेतकरी वेगळा आहे का असे शेतकऱ्यांनी सांगितले .

असे अनेक प्रश्न पुर्व हवेलीतील नागरिकांना भेडसावत असुन अधिकारी मात्र उडवाउडवीची उत्तरे नागरिकांना देत आहेत .त्यामुळे पुर्व हवेलीतील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी दोन तीन महिन्यातुन एकदा तरी कितीही व्यस्त कार्यक्रम असले तरी पुर्व हवेलीचा दौरा करणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी बोलुन दाखवले.

**खासदार डॉ. अमोल कोल्हे हे संसदेत शेतकऱ्यांची बाजु भक्कमपणे मांडतात मग तो कांदयाचा प्रश्न असो की पाण्याचा प्रश्न असो .परंतु प्रत्यक्षात शेतकरी अधिकाऱ्यांकडे एखाद्या प्रश्न घेऊन गेले की अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत .त्यामुळे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी या भागाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावा असे पुर्व हवेलीतील नागरिकांचे म्हणणे आहे.**

## मराठी चित्रपटसृष्टीमध्ये कथा हीच हिरो असते : सयाजी शिंदे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दक्षिणेपेक्षा मराठी चित्रपटांचे कथानक हे सरस असते. त्याच बरोबर मराठी चित्रपटसृष्टीमध्ये कथा हीच हिरो असते असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित केले पत्रकार परिषदेत केले.

घटनात्मक हक्कांची जाणीव करून देणारा '२६ नोव्हेंबर' चित्रपट ९ मे रोजी होणार संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. '२६ नोव्हेंबर' हा केवळ चित्रपट नसून, ही एक चळवळ आहे. अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित, सचिन उराडे लिखित आणि दिग्दर्शित '२६ नोव्हेंबर' हा घटनात्मक हक्कांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा चित्रपट येत्या ९ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असल्याची माहिती निर्माते अनिल कुमार जवादे यांनी दिली. या चित्रपटात अनिकेत विश्वासराव,



सयाजी शिंदे, विजय पाटकर, गणेश यादव, मुश्ताक खान, भारत गणेशपुरे, किशोर चौगुले, डॉ. जुई जवादे, डॉ. विलास उजवणे आणि अंजली उजवणे यांसारखे प्रतिभावान कलाकार प्रमुख भूमिका साकारली आहे. '२६ नोव्हेंबर' हा चित्रपट त्याच्या शक्तिशाली कथाकथनाच्या माध्यमातून प्रेक्षकांना केवळ भावनिक करणार नाही, तर त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची नवी प्रेरणा देईल. हा सिनेमा नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी उभा राहिलेला एक प्रेरणादायी आवाज आहे. असे निर्माते अनिल कुमार जवादे आणि कार्यकारी निर्माते निलेश ओंकार यांचे एकमत आले.

## पाकिस्तानातील नेमक्या त्याच ९ ठिकाणांवर हल्ला का?

**ऑपरेशन सिंदूर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे 22 एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. त्यामध्ये 26 पर्यटकांचा मृत्यू झाला होता. पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले होते. भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले पाहिजे अशी मागणी केली जात होती. आज 7 मे रोजी म्हणजेच दहशतवादी हल्ल्याच्या 14 दिवसांनंतर पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले आहे. भारताने पाकिस्तानातील 9 ठिकाणी एअर स्ट्राईक केला आहे. पण हीच 9 ठिकाणे का निवडण्यात आली?

भारताने पाकिस्तान अधिकृत जम्मू-कश्मीरमधील मुजफ्फराबाद, कोटली, गुलपुर, बिंबर आणि सियालकोट, चक अमरू, मुरीदके, बहावलपूर अशा 9 ठिकाणी एअर स्ट्राईक केला. पण हीच ९ ठिकाणे का निवडी असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

सियालकोट हा भारत आणि पाकिस्तान सिमेवरील दहशतीचा अड्डा आहे. या भागाला दहशतवादी हालचालींचे केंद्र असे म्हटले जाते. हे ठिकाण भारतातील जम्मू सीमेच्या जवळ आहे. त्यामुळे शस्त्र व अतिरेक्यांचे प्रवेशद्वार म्हणून महत्त्वाचे मानले जाते. वाचा: भारताचा सर्वात मोठा शत्रू दहशतवादी मसूद अजहर मारला गेला का? हल्ल्यात जैशचे टॉप कमांडर ठार

दहशतवाद्यांना पंजाबमधून भारतात प्रवेशाचा मार्ग चक अमरू येथून आहे. शस्त्र व दहशतवादी भारतात पाठवण्यासाठी वापरले जाणारे हे ठिकाण आहे. तसेच ड्रोन व स्मगलिंगद्वारे भारतात प्रवेशासाठी याचा वापर होत असल्याची माहिती होती. त्यामुळे एअर स्ट्राईकसाठी हे ठिकाण निवडण्यात आले होते.

दहशतवादी घुसखोरीसाठी भिंबर हे ठिकाण महत्त्वाचे आहे. भारतीय लष्कराच्या ऑपरेशन्समध्ये याठिकाणी अनेक हालचाली टिपल्या गेल्या होत्या. त्यामुळे दहशतवाद्यांच्या या ठिकाणावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला असल्याचे म्हटले जाते.

गुलपूर हे दहशतवादी प्रक्षेपण स्थळ म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण भारतात शस्त्रास्त्रे व अतिरेकी घुसवण्यासाठी वापरले जाते. गुप्तचर अहवालानुसार, याठिकाणी दहशतवाद्यांना LOC पार करण्यासाठी सज्ज ठेवले जाते.

कोटली येथे दहशतवादी प्रशिक्षण शिबिर घेतले जाते. या भागाला नवे दहशतवादी घडवले जाणारा कारखाना असे ही म्हटले जाते. जैश, लष्कर व हिजबुल यांच्या संयुक्त कारवायांसाठी या ठिकाणाचा वापर करण्यात आला आहे. जंगल युद्धाचे प्रशिक्षण इथे दिले जाते. तसेच LOC जवळ वसलेले प्रशिक्षण केंद्र आहे.

POK मधील दहशतवादाचे केंद्र म्हणून मुजफ्फराबाद ओळखले जाते. याठिकाणी हिजबुलच्या कॅडरला प्रशिक्षण दिले जाते. हा घुसखोरीसाठी महत्त्वाचा मार्ग मानला जातो.

मुरीदके येथे लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय आहे. येथेच 26/11च्या झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा कट रचला गेला होता. हे एक जमात-उद-दवाच्या नावाखाली चालणारे कट्टरवादी केंद्र आहे. लष्कर-ए-तैयबा इथून आर्थिक, धार्मिक आणि शस्त्रप्रशिक्षण मोहीमा चालवते. भारतात मोठ्या घातपाताच्या योजना याच ठिकाणाहून आखल्या जातात.

बहावलपूर हे मसूद अझहरचा गड आहे. तसेच जैश-ए-मोहम्मदचे सर्वात सक्रिय तळ आहे.

## अनोळखी आरोपींच्या १२ तासात आवळल्या मुसक्या

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**



दिनांक २८/०४/२०२५ रोजी रात्री ०१/४५ वा. चे सुमारास इसम नामे सुरज प्रशांत वाघमारे (वय १६ वर्षे व्यवसाय शिक्षण, पत्ता गोपाळपटटी मांजरी बुद्रुक ता. हवेली जि. पुणे ) हा ३ मित्रांसह प्रेम( पूर्ण नाव माहिती रा. कवडीपाट टोलनाका) याच्या कडे असलेल्या पैशांची मागणी करण्याकरीता गेले होते. त्यांना प्रेम याचे घर माहिती नसल्याने, कपडीपाट टोलनाका येथील इराणी चहाच्या हॉटेलजवळ थांबलेल्या ३ अनोळखी इसमांकडे शंकर कदम याने प्रेम याच्या घराबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी त्यास कारण विचारले असता त्याने प्रेम याच्या कडुन पैसे घ्यायचे आहेत असे सांगितले. त्यावर सदर ३ अनोळखी इसमांनी त्यांचे आणखी अनोळखी साथीदार यांना तेथे बोलावुन घेवून त्यांना हॉकी स्टीक व धारदार हत्याराने मारहाण करुन गंभीर जखमी केले. या मारहाणीमध्ये प्रेम याने त्याचेकडील धारदार हत्याराने शंकर कदम याच्या डोक्यावर वार करून त्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्यांनी शाहीद शेख याच्या देखील डोक्यात धारदार शस्त्राने वार करुन त्यास गंभीर जखमी केले. आहे. या बाबत लोणी काळमोर पोलीस ठाणेस दि. २८/०४/२०२५ रोजी गु. २. नं. १८५/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम १०९ (१), ११८ (१), १८९ (२). १८९ (४), ३५२. ३५१ (3) भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कालम ३० (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

हा गुन्हा दाखल झाला त्यावेळी फिर्यादी यांनी प्रेम व त्याचे सोबतचे अनोळखी इसम यांचेविरुध्द तक्रार दाखल केली होती. गुन्हा दाखल झाला त्यावेळी आरोपींची नावे निष्पन्न झाली नव्हती . गुन्हा दाखल होताच गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून, पोलीस उप आयुक्त सतो. परिमंडळ ५ पुणे शहर व सहाय्यक पोलीस आयुक्त हडपसर विभाग, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे लोणी काळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी तात्काळ पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करून त्यांना आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश दिला.

लोणी काळभोर पोलीसांनी गुन्हा दाखल होताच फरार आरोपी प्रेम याचा गोपनिय बातमीदारांमार्फत बातमी प्राप्त करून, त्यास ताब्यात घेतले व त्याचेकडे तपास करुन गुन्हयातील इतर आरोपीतांची नावे निष्पन्न केली. त्यानुसार लोणी काळभोर पोलीसांनी १२ तासांच्या आत आरोपी १) अक्षय अशोक बदर (वय २८ वर्षे रा. लोणीकाळभोर ) २) प्रसाद खंडू ढोबळे (वय २१ वर्षे रा. कदमवाकवस्ती) यांची नावे गुन्हयात निष्पन्न करुन त्यांना अटक केली. असुन इतर ४ विधी संघर्षीत बालकांची देखील नावे निष्पन्न करुन त्यांना ताब्यात घेवुन, गुन्हा उघडकीस आणला आहे.

हा गुन्हा अनोळखी आरोपीं विरुध्द दाखल असताना तसेच सर्व आरोपी गुन्हा केल्यानंतर फरार झाले असताना देखील, १२ तासांच्या आत लोणी काळभोर पोलीसांनी गुन्हयाचा कौशल्यपुर्णरित्या तपास करुन तांत्रीक द भौतीक पुराव्यांच्या आधारे आरोपीतांची नावे निष्पन्न केली व त्यांना गुन्हयात अटक केले आहे. त्यामुळे अतिशय गंभीर स्वरुपाचा गुन्हा १२ तासांच्या आत उघडकीस आणण्यात लोणी काळभोर पोलीसांना पुन्हा एकदा यश आले आहे.

ही उत्कृष्ठ कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ५. पुणे शहर व अनुराधा उदमले, सहा, पोलीस आयुक्त हडपसर विभाग, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजेंद्र पन्हाळे, पोलीस उप निरीक्षक रत्नदिप बिराजदार, पो. उप निरी. सोनटक्के, पो. हवा, गणेश सातपुते, पो. हवा. रामहरी वणवे, पी. हया. विलास शिंदे, पो. शि. बाजीराव विर, पो. शि. प्रदिप गाडे, पो. शि. चक्रधर शिरगीर, पो. शि. राहुल कर्डीले, पो. शि. सचिन सोनवणे, पो. शि. अमोल जाधव यांच्या पथकाने केली आहे.







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.